॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनीधी) दि. ६ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील एमबीए विद्यार्थ्यांसाठी ग्राइंड मास्टर मशीन्स प्रा. लि., संभाजीनगर या कंपनीच्या कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. या निवड प्रक्रियेसाठी एकूण ४० विद्यार्थी उपस्थित होते.

कंपनीचे ग्रुप हेड संदीप पिंपळे व मार्केटिंग मॅनेजर निखील मुसळे यांनी विद्यार्थ्यांची ऑनलाइन चाचणी घेतली. त्यानंतर पात्र विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यात वैष्णवी खेडकर व आदित्य पाटील या दोन विद्यार्थ्यांची कंपनीत निवड झाली.

कॅम्पस मुलाखतीचे आयोजन व व्यवस्थापन प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा आणि प्लेसमेंट सेलचे उपसमन्वयक प्रा. रामेश्वर चव्हाण यांनी केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे आणि केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल डी. पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

**बातमी नं. २**

जळगाव, (प्रतिनीधी) दि. ६ ऑक्टोबर: गांधी सप्ताहानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत महात्मा गांधी अध्यासन व संशोधन केंद्राच्या वतीने आदिवासी अकादमी, नंदुरबार येथे ६ ऑक्टोबर रोजी एकदिवसीय गांधी विचार व श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी विचारधारा प्रशाळेचे संचालक डॉ. म. सु. पगारे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तथा जी. टी. पी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्रसिंग रघुवंशी, ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत कांतिलाल ताटीया, महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे संचालक डॉ. उमेश गोगडीया व डॉ. मनोज इंगोले आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. महेंद्रसिंग रघुवंशी यांनी गांधी विचार शांतता प्रस्थापित करण्यासाठी उपयुक्त असून, विद्यार्थ्यांनी त्याचा अंगीकार करावा, असे प्रतिपादन केले. डॉ. म. सु. पगारे यांनी गांधीजींच्या 'सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रातील दाखले देत गांधी विचार हा जीवनातील प्रेरणेचा स्रोत असल्याचे सांगितले. दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. विश्वास पाटील यांनी 'गांधी विचार : काल, आज आणि उद्या', तर डॉ. मनोज इंगोले यांनी 'गांधी विचारांची प्रासंगिकता' या विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

समारोप सत्रात अधिसभा सदस्य डॉ. जयंत उत्तरावर व डॉ. दिनेश खरात उपस्थित होते. आदिवासी अकादमीच्या 'टाकाऊपासून टिकाऊ' स्पर्धेतील विजेत्यांचा यावेळी स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाजकार्य विभागाच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी कनिका पाडवी यांनी केले, तर प्रा. स्मिता देशमुख यांनी आभार मानले.

**बातमी नं. ३**

जळगाव, (प्रतिनीधी) दि. ६ ऑक्टोबर : जय हिंद शैक्षणिक ट्रस्ट, धुळे संचलित झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालयातर्फे महात्मा गांधी जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रपिता महात्मा गांधी वक्तृत्व स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राने यावर्षीचा फिरता चषक पटकावला.

दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या या स्पर्धेत मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेसाठी महात्मा गांधीजींच्या नैतिक नेतृत्वाच्या विचारांवर आधारित विषय देण्यात आले होते. भाषा अभ्यास प्रशाळेच्या वतीने एम.ए. मराठी द्वितीय वर्षाचा विद्यार्थी स्वप्निल जाधव आणि हिंदी द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी हर्षदा महाजन यांनी सहभाग घेतला. स्वप्निल जाधव याने स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला.

विद्यार्थ्यांच्या सांघिक सादरीकरणामुळे भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राला फिरता चषक मिळाला. प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सू. पगारे यांनी स्वप्निल जाधव व हर्षदा महाजन यांचे कौतुक करून त्यांचा सन्मान केला. संघ व्यवस्थापक खेमराज पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समन्वय साधला.

.........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ६ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**